रत्नाकर गायकवाड
मुख्य माहिती आयुक्त

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२८५ ६० ७८
फॅक्स क्रमांक : ०२२-२२०४ ९३ ९०
E-mail : ratnakargaikwad@hotmail.com
१३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.
अ.शा प क्र.मुमाआ/अपील/शास्ती/२०१२.
दि. १७ ऑगस्ट, २०१२.

प्रिय श्री.मीना,

माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये ज्या प्रकरणात जन माहिती अधिकारी हे आपले कर्तव्य नीट बजावित नाहीत व माहिती देण्यास टाळाटाळ करतात तसेच चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देतात, त्यांच्या विरुध्द शास्ती लादण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियमात आहे. आयोगाने आतापर्यंत १७४९ प्रकरणांमध्ये शास्ती लावली असून, याबाबतची प्रत्यक्ष वसूल मात्र योग्य रितीने होत नसल्याचे दिसून आले आहे.

यासाठी आयोगाच्या निर्णयानुसार आता, प्रत्येक शास्तीच्या आदेशाची प्रत संबंधित विभाग प्रमुखांना दिली जाते कारण संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनातून शास्तीच्या रकमेची वसूली करणे ही सर्वस्वी जबाबदारी त्या त्या विभाग प्रमुख यांची राहील.

आपणांस विनंती करण्यात येते की, याबाबतच्या स्वयंस्पष्ट सूचना राज्यातील सर्व विभाग प्रमुखांना देण्यात याव्यात.

सस्नेह!

आपला स्नेहांकित,

रत्नाकर गायकवाड

श्री. पी. एस. मीना
अपर मुख्यसचिव (र. व का.),
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई.